अतितात्काळ

क्र. पोमसं/२/१०२०/नि.सू. १९-२० बि.सं.(अभि.)/२३५/२०१८
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई- ४०० ००१.
दिनांक :- ०३/०३/२०२१.

**संदर्भ** :- शासन आदेश, गृह विभाग, क्र. रापोसे-०४१८/प्र. क्र.३०२/पोल-१ अ, दि.०२-०३-२०२१ (प्रत संलग्न केली आहे).

**विषय** :- "पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी)" पदावर पदोन्नतीने पदस्थापना...

* * * * * *

"पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी)" या संवर्गातील पदांवर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या, सन २०१९-२०२० च्या तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या "पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी)" या संवर्गातील अधिकाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात खुल्या प्रवर्गातील पदावर पदोन्नतीवरील पदस्थापनेबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश याद्वारे कळविण्यात येत आहेत :-

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

I. उपरोक्त शासन आदेशांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात यावी, व तसा अनुपालन अहवाल सत्वर या कार्यालयास पाठवावा.

II. पदोन्नती प्राप्त पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) यांच्या नावांसमोरील नमूद सध्याच्या नियुक्ती ठिकाणी काही बदल झालेला असेल तरी सदर अधिकारी सध्या ज्या ठिकाणी कार्यरत असेल त्या घटकप्रमुखांनी अशा पोलीस निरीक्षकास त्यांच्या नावासमोरील नमूद पदोन्नतीवरील पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कोणत्याही प्रतिक्षेविना तात्काळ कार्यमुक्त करावे.

III. पदोन्नती आदेशाधिन अधिकाऱ्यास नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करून, कार्यमुक्त केल्याची, तसेच ते नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाल्याची तारीख संबंधीत घटक प्रमुखांनी तात्काळ या कार्यालयास कळवावी. तसेच, प्रस्तुत अधिकाऱ्यांविरूध्द गुन्हा दाखल झाला असेल किंवा खात्यांतर्गत शिक्षेचे आदेश निर्गमित झाले असतील, किंवा कोणाही अधिकाऱ्यास निलंबित केले असल्यास तसेच, सदर अधिकारी वेतनवाढ रोखण्याची शिक्षा भोगत असल्यास, संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्याविरूध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास तात्काळ कळवावी, व पुढील आदेशांची वाट पहावी. पदोन्नतीवरील अधिकारी जर नेमणुकीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरूद्ध या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दिनांक १६.०९.१९८३, ११.०१.१९८४ व १०.०२.१९९१ तसेच क्र. पोमसं /३/५५०७/६/९७, दिनांक १३.०२.१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

IV. उपरोक्त अधिकाऱ्यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकिनंतर जर त्यांच्याविरूध्दच्या प्रलंबित / प्रस्तावित विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने शिक्षा झाल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार, पदोन्नती संदर्भात पुढील कार्यवाही करावी व तसे या कार्यालयास तात्काळ कळवावे.

V. उपरोक्त पदोन्नती, मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ वर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहुन करण्यात येत आहे.

VI. सदर तदर्थ पदोन्नती निव्वळ तात्पुरती स्वरूपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी उपरोक्त अधिकाऱ्यास नियमितपणा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

VII. उपरोक्त आदेशांतील अधिकाऱ्यांच्या पदभार हस्तांतरण प्रमाणपत्राच्या प्रती कृपया सत्वर या कार्यालयास पाठवाव्यात.

VIII. काही घटकांमध्ये निवडणूक आचारसंहिता चालू असेल त्या घटक प्रमुखांनी निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर त्यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांना पदोन्नतीवरील नियुक्ती ठिकाणी कार्यमुक्त करावे.

IX. ज्या ठिकाणाबाबत कोणत्याही न्यायालयाचे काही विशिष्ट आदेश असतील परंतु त्याठिकाणी सदर आदेशान्वये पदस्थापना झाली असेल तर अशा न्यायालयीन आदेशाची अवमान्यता होणार नाही याचीही दक्षता घेण्यात यावी.

X. उपरोक्त अधिकाऱ्यांपैकी एखाद्या विरूध्द आता गुन्हा दाखल झाला असेल, किंवा खात्यांतर्गत शिक्षेचे आदेश निर्गमित झाले असतील, किंवा त्यांना निलंबित केले असल्यास संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्याविरूध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास तात्काळ कळवावी, व पुढील आदेशांची वाट पहावी.

XI. पदोन्नती आदेशाधिन अधिकारी पदोन्नतीवर कार्यमुक्त झाल्याची, तसेच नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाल्याची तारीख संबंधीत घटक प्रमुखांनी तातडीने या कार्यालयास कळवावी.

XII. पदोन्नतीवरील अधिकारी जर नेमणुकीच्या ठिकाणी तातडीने हजर झाले नाहीत, तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरुध्द या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दि. १६/०९/१९८३, ११/०१/१९८४ व १०/०२/१९९१, तसेच क्र. पोमसं/३/५५०७/६/९७, दि. १३/०२/१९९७ च्या परिपत्रकांतील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

XIII. पदोन्नतीवर पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदावर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, अथवा अन्य न्यायालयाचे स्थगित आदेश असल्यास ते विचारात घेऊन उक्त अधिकाऱ्यांना पदोन्नतीवर पदस्थापना देण्यात यावी.

३/३

**( कुलवंत कुमार सारंगल )**
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना )
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, पुणे शहर / नागपूर शहर
अपर पोलीस महासंचालक / संचालक, दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर / अमरावती परिक्षेत्र, अमरावती / औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद
पोलीस अधीक्षक, धुळे / पुणे ग्रामीण
पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, पश्चिम विभाग,पुणे / पूर्व विभाग, नागपूर

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
( **लक्षवेध :- श्री. स्वप्नील बोरसे,** कक्ष अधिकारी)

प्रत, सस्नेह :-

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

प्रत :-

संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ३-अे, ९, ११, १४-अ, ३६ व ४०.
पोलीस उप अधीक्षक, संगणक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. प्रस्तुत पदोन्नती आदेश " **पोलीस उप अधीक्षक / सहायक समादेशक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) निवडसूची २०१९-२०२०"** या शिर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेत स्थळावर पुढील एक महिन्यासाठी प्रसिध्द करावे.

निवडसूची सन २०१९-२०२०.
पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना....

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**शासन आदेश क्र. रापोसे-०४१८/प्र.क्र.३०२/पोल-१(अ)**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक :- ०२ मार्च, २०२१

**शासन आदेश :-**

"पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी)" या पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१९-२०२० च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या "पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी)" या संवर्गातील खालील अधिकाऱ्यांना "पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी)" या संवर्गातील पदावर तात्पुरत्या स्वरुपात खुल्या प्रवर्गातील पदावर पदोन्नती देण्यात येत असून, खालीलप्रमाणे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पोलीस निरीक्षक पदावरील नियुक्तीचे ठिकाण | पदोन्नतीनंतरचे नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. बाळासाहेब किसन घोडेकर | पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यालय | पोलीस उप अधीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), नागपूर परिक्षेत्र |
| २ | श्री. अरविंद धोंडिबा अल्हाट | अपर पोलीस महासंचालक, बिनतारी संदेश, पुणे यांचे कार्यालय | सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), नागपूर शहर |
| ३ | श्री. मंगल देविचंद भारुडे | पोलीस अधीक्षक, धुळे यांचे कार्यालय | पोलीस उप अधीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), पूर्व परिक्षेत्र, नागपूर |
| ४ | श्री. सीताराम लक्ष्मणराव जाधव | पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, यांचे कार्यालय | पोलीस उप अधीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी), (मुख्यालय), पुणे |

२. "पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी)" या पदावर पदोन्नती देण्यात आलेल्या सन २०१६-२०१७ च्या तदर्थ पदोन्नतीसूची मधील समावेशनांती श्री. संजय तानाजी हांडे यांना आणि सन २०१५-१६ च्या तदर्थ पदोन्नतीसूची मधील समावेशनांती श्री. संजय सुभाष चांदखेडे यांना तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे. आता सदरहु अधिकाऱ्यांचा सन २०१९-२०२० च्या नियमित निवडसूचीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

३. उपरोक्त पदोन्नत्या, मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ वर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णय आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाच्या असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी उपरोक्त अधिकाऱ्यांस नियमितपणा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

४. पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेल्या पदांवर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे आदेश आणि निवडणूक आचारसंहिता असल्यास, ते विचारात घेऊन उक्त अधिकाऱ्यांस पदस्थापना देण्यात यावी.

५. उक्त पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांस, सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करून, त्यांना पदोन्नतीच्या पदावर रूजू होण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरित करावी.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२१०३०२२१११५६५२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

GAIKWAD KAILAS ARJUN

Digitally signed by GAIKWAD KAILAS ARJUN [illegible]

( कैलास गायकवाड )
उप सचिव, गृह विभाग

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-

१. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामिण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१०. अपर पोलीस महासंचालक/ संचालक दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
११. सर्व पोलीस आयुक्त,
१२. सर्व पोलीस अधीक्षक,
१३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
१४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१६. सर्व संबंधित अधिकारी (पोलीस महासंचालक यांचेमार्फत),
१७. निवडनस्ती पोल-१अ.